## नियमित दिवाणी दावा क्र. ६०/२०१९ मधील नि १५ वरील आदेश

प्रतिवादीने सदर अर्ज त्याचे लेखी जबाबात दुरूस्तीसाठी केला आहे. वादीने सदर अर्जावर पाठीमागील बाजुस त्याचे म्हणणे दिलेले आहे. अर्ज व म्हणणे वाचले, युक्तीवाद ऐकला.

२. खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे:-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | लेखी जबाबात प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी देणे योग्य आहे का ? | होय. |
| २. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ व २ :-**

३. वादीने सदरचा दावा हा उद्घोषणा, स्वतंत्र वाटणी व ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे व सदर दाव्यामध्ये प्रतिवादी हे हजर झाले असुन त्यांनी त्यांचा लेखी जबाब अदयाप दाखल केलेला नाही. लेखी जबाबामध्ये अनावधनाने काही बाबी नमुद करावयाच्या राहुन गेले असुन अर्ज परिच्छेद क्र. १ मध्ये परिच्छेद क्र. १८-अ म्हणून नमुद केलेला मजकुर दुरुस्तीअन्वये समाविष्ठ करण्यासाठी अर्जाव्दारे विनंती केली आहे. सदर दुरुस्ती ही दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल घडविणारी नसुन निकालासाठी दुरुस्तीस परवानगी मिळणे आवश्यक आहे. तर, वादीनी सदर अर्जास सक्त विरोध दर्शवुन प्रस्तुत अर्ज नियमानुसार नाही, मुळ स्वरूपात बदल करणारा आहे, वादीला केवळ त्रास देण्याचा तसेच प्रकरण लांबणीवर टाकण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्ज रु. ५,०००/- च्या कॉस्टवर खारीज करण्याची विनंती केलेली आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ हा दाव्यातील पक्षकाराना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार परवानगीची संधी देणे असा आहे. दुस-या बाजुचे अपरिमीत नुकसान होत नसेल किंवा त्यांच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयास मुभा आहे जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात काही बदल होणार नसेल तर दुरूस्ती मान्य करता येते.

५. प्रस्तावीत दुरुस्ती ही नि.क्र. ०५ च्या सुनावणीच्या टप्पयावर असतांना करण्याचा प्रतिवादीचा मानस आहे. प्रतिवादी मागीत असलेली दुरुस्ती अथवा समाविष्ठ करू इच्छित असलेला मजकुर हा तथ्य व कायदेशीर बाबीअनुषंगे असल्याचे दिसुन येते. जरी, प्रस्तुत दावा नि.क्र. ०५ वर सुनावणीच्या टप्प्यावर असला तरी अदयाप सदर प्रकरणात नि. क्र. ०५ वर सुनावणी करण्यात आलेली नाही. यापूर्वी प्रतिवादीच्या वतीने नि.क्र. १३ वर कैफियत दाखल करण्यात आलेली आहे. सदर लेखी जबाबात प्रतिवादच्या वतीने वादपत्रातील कथन अमान्य करण्यात आलेले आहे. वादी क्र. १ च्या बाबत प्रस्तावित दुरुस्तीतील तथ्य ही प्रतिवादीला ज्ञात असणारी आहे कारण वादी व प्रतिवादी हे एकाच कुटूंबातील घटक आहेत. असे असले तरी प्रतिवादीच्या वतीने सदरची बाब ही अनावधानाने नमुद करणे राहून गेल्याचे सांगण्यात आले व त्याअनुषंगे शथपपत्र सुध्दा अर्जासोबत देण्यात आलेले आहे. अर्जातील प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगेचा मजकुर हा तथ्य तसेच कायदेशीर बाबीअनुषंगे असल्याने प्रतिवादीस त्याचे पूर्ण बजाव अभिलेखावर आणण्यासाठी लेखी जबाबात दुरुस्तीची परवानगी देणे योग्य ठरणार आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही आमुलाग्र असा बदल होत नाही अथवा वादीचे अपरिमीत हानी होईल असेही दिसुन येत नाही. प्रकरणातील वस्तुस्थिती ही अभिलेखावर येवून प्रकरणाच्या न्यायनिकालाला मदत होणार आहे. या ठिकाणी हे नमुद करावे लागेल की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने ऑगस्ट २०१९ मध्ये त्यांचे लेखी कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रस्तावित दुरुस्तीच्या अनुषंगे प्रतिवादीने विलंब केलेला आहे. मात्र, सदरच्या विलंबामुळे वादीचे झालेले नुकसान हे खर्चाच्या स्वरूपात भरून काढता येईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. प्रतिवादीचा नि. १५ वरील अर्ज रुपये ५००/- खर्च वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादीस त्याचे लेखीजबाबात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरची दुरुस्ती प्रतिवादीने विहित मुदतीत करावी व दुरुस्त प्रत सादर करावी.

दिनांकः- ०४.१२.२०२३

**(शरद ना. गवळी)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
रिसोड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr. Clerk | : | **Rohan S. Koshti** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 04.12.2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 04.12.2023 |
| **Order uploaded on** | **:** | **04.12.2023** |